स्थायी समितीच्या **शनिवार** दिनांक 09–02–2013 रोजी सकाळी 11–30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## <u>उपस्थित सभासद</u>

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. तिवारी दयाशंकर चंन्द्रशेखर | अध्यक्ष |
| 2. | सौ. कानतोडे भाग्यश्री गणेश | सदस्या |
| 3. | श्री. सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 4. | सौ. बहादुरे सरोज राजु | सदस्या |
| 5. | श्री. फुके परिणय रमेश | सदस्य |
| 6. | श्री. खान असलमखां रशीद खान | सदस्य |
| 7. | श्री. डोळस रविंद्र गोविंदराव | सदस्य |
| 8. | श्री. राजू ज्योतीरामजी लोखंडे | सदस्य |
| 9. | सौ. सुजाता विठ्ठलराव कोंबाडे | सदस्या |
| 10. | श्री. थूल राजू वासुदेवराव | सदस्य |
| 11. | सौ. प्रगती अजय पाटील | सदस्या |
| 12. | सौ.अलका अजय दलाल | सदस्या |

## <u>अनुपस्थित सभासद</u>

| | | |
|---|---|---|
| 1. | सौ. वानखेडे अनीता प्रदिप | सदस्या |
| 2. | श्री. हजारे पुरूषोत्तम नागोराव | सदस्य |
| 3. | श्री. गुडधे प्रफुल्ल विनोदराव | सदस्य |
| 4. | सौ.जैसवाल हर्षला संजय | सदस्या |

## <u>उपस्थित अधिकारी</u>

1) श्री. श्याम वर्धने, निगम आयुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक 391 :–** नागपूर शहरातील सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यांच्या बाजुला असलेले फायबरचे मुत्रीघर, पक्के मुत्रीघर व प्रभागांमधील सार्वजनिक शौचालयाची स्वच्छतेच्या दृष्टीने निगा व देखभाल ठेवण्याकरिता यांत्रिकी पध्दतीने साफ सफाई करण्यासाठी दोन वर्षाच्या कालावधीकरीता स्थायी समिती ठराव क्र. 46 दि. 28.05.2012 नुसार निविदा मागविण्यात आल्या असता दोन निविदा प्राप्त झाल्या त्यात मे. ब्रिक्स फॅसीलीटी प्रा.लि.नागपूर यांचे निम्नतम दर रु. 2,19,55,032/– प्राप्त झाले. वाटाघाटी नंतर कंत्राटदाराने रु. 2,12,55,032/– वार्षीक रक्कमेवर काम करण्याची तयार दर्शविली. स्थायी समिती ठराव क्र. 46 दि. 28.05.2012 च्या ठरावावर पुर्नविचार करण्याचा तसेच निविदा मंजुर होईस्तोवर जुन्या दरावर काम सुरु ठेवण्याचा व खर्च पद क्र. 213 व 178 मधुन भागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन कंत्राटदाराने रु. 2,12,55,032/– वार्षीक रकमेवर काम करण्याची तयारी दर्शविली असल्यामुळे त्यास मंजूरी प्रदान करुन स्थायी समिती ठराव क्र. 46 दि. 28.05.2012 च्या ठरावावर पुर्नविचार न करता समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 392 :–** प्रभाग क्र. 8, गोरेवाडा येथे पिवळयानदीवर पुलाचे बांधकाम व ईतर बांधकाम करण्याच्या कामास्तव मे. एस.के. इंटरप्राईजेस यांची न्युनतम दरावरील रु. 34,02,378/– ची प्राकलनीय राशीपेक्षा 3.5 टक्के कमी दराची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 393 :–** अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागाकरिता म.न.पा. ठराव क्र. 383 दिनांक 08.11.2010 अन्वये खरेदी करण्यात आलेले चार TATA LPT 1613/42 चेसीस वर महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाद्वारे करण्यात आलेल्या दरकरारातील स्पेसीफीकेशन अनुसार फायर वॉटर टेंडर फॅब्रीकेशनचे कार्यादेश महाराष्ट्र शासनाचे महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय यांचे पत्र क्र. मअसे/8–अ/2011/873 दि. 14 सप्टेंबर, 2011 अन्वये मंजूर करण्यात आलेल्या दरकरारानुसार रु. 17,15,000/– प्रती या प्रमाणे मे. विजय फायर व्हेईकल्स ॲन्ड पम्पस् लि. प्लॉट नं. 35, चांदीवली, मुंबई यांना देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 394 :–** प्रभाग क्र. 35–ब, भवानी मंदिर गेट ते नाग नदी पूलापर्यंत रस्ता रुंदीकरण, ड्रेनेज व डांबरीकरणाचे कामास्तव रु. 88,25,255/– रकमेच्या प्राकलनास पद क्र. 681 अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन लघुनिविदा काढण्यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 395 :–** प्रभाग क्र. 17–अ, मध्ये बैरागीपुरा, शाद हॉस्पीटल खांबाळकर मोहल्ला येथे सी.सी.पेव्हमेंट करणे व प्रभाग क्र. 17–ब, प्रेमनगर येथे रस्त्याचे डांबरीकरण व फुटपाथ बांधकामास्तव रु. 29,99,250/– रकमेच्या प्राकलनास पद क्र. 682 (फिक्स प्रा.) अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन वेगवेगळया लघुनिविदा काढण्यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 396** :— प्रभाग क्र. 41, येथे गांधी कन्या म.न.पा. शाळेच्या जागेवर स्पोर्टस् कॉम्प्लेक्सचे बांधकामास्तव रु. 1,76,51,924/— रकमेच्या प्राकलनास पद क्र. 769 अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच या कामास्तव मे. लेट्स बिल्ड, यांना सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास व म.न.पा. च्या प्रचलित नियमानुसार सेवाशुल्क प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन अर्थ संकल्प 2012—2013 च्या पद क्र. 769 मधे, "स्व. रामजिवन चौधरी अंतर्गेही क्रिडा" संकुलास म.न.पा. द्वारे मान्यता प्रदान केली असल्यामुळे या पुढे या कामाच्या पुढील प्रक्रिये मध्ये वरील नामकरणास कार्यवाही करण्याकरिता सुचविण्यांत येऊन लघुनिविदा काढण्यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 397** :— सुदामा मित्र योजने अंतर्गत सुधारीत मनोरुग्नावर उपचार करुन त्यांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने धंतोली झोनल कार्यालयाजवळील म.न.पा. शाळेच्या ईमारतीचे नुतनीकरण करण्याच्या कामाची प्राकलनीय दरापेक्षा 10.25 टक्के ने कमी असलेली मे. बाबा कन्स्ट्रक्शन यांची रु. 24,47,606/— राशीची निम्नतम निविदेस मंजूरी व कार्यादेश तसेच या कामाकरिता म. न.पा. मध्ये नोंदणीकृत प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार मे. उमेश पाटील यांना म.न.पा. च्या मंजूर दरानुसार रु. 1,13,085/— रकमेचा कार्यादेश देण्यास मंजूरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 398** :— प्रभाग क्र. 40—ब, ज्योतीनगर येथे समाज भवनाचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त चार निविदा पैकी, मे. दिप कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 0.1 टक्के कमी दराची रु. 42,92,465/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

++ ++ ++

ठराव क्रमांक 399 :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर